

दस नंबरी 'नितिश कुमार'

दहाव्यांदा मुख्यमंत्री... पान②

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

प्रत्येक क्षण हा काहीतरी शिकवणारा असतो, त्यामुळे आजच्या अडचणी उद्याच्या यशाचा पाया रचतील यावर विश्वास ठेवा.

वर्ष : ०५ | अंक : ९९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२२ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# राज्यातील शिक्षकांसाठी आनंदाची बातमी!

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२१, नाशिक :**
ज्ञानदानाव्यतिरिक्त अवांतर कामांमध्ये शिक्षक भरडले जाऊन ज्ञानदानाच्या मुख्य कार्यावर परिणाम होतो. याबाबत वर्षानुवर्षे शिक्षकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे आता शालेय स्तरावरील पंधराऐवजी चार प्रमुख समित्याच कार्यरत राहतील. त्याद्वारे वाचणारा वेळ शिक्षकांना ज्ञानदानासाठी खर्च करता येईल, असे प्रतिपादन शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी येथे केले.



जिल्हा परिषदच्या शिक्षण विभागातर्फे परशुराम साईखेडकर नाट्यगृहात आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्यमंत्री नरहरी झिरवाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, शिक्षणाधिकारी सरोज जगताप, शिक्षणाधिकारी डॉ. प्रशांत दिग्रसकर, भास्कर कनोज, शिवसेना (शिंदे गट) महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, संपर्कप्रमुख विलास शिंदे, राजू लवटे, भाऊलाल तांबडे आदी उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले, की केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यासोबत झालेल्या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशपातळीवर सर्व शाळांमधून विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांतून ज्ञात होण्यासाठी तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. राज्यात सर्व माध्यमांच्या शाळांमधून मराठी भाषा शिकविणे व राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत गायले जाणे बंधनकारक केले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

शाळेत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पाचवी व आठवीसह चौथी व सातवीसाठीही सुरू करण्यात येणार असल्याचेही नमूद केले. जिल्हा परिषदेचे सीईओ पवार, पुरस्कारार्थी शिक्षक रमाकांत जगताप, वंदना भामरे आदींनीही मनोगत व्यक्त केले. महापालिकेचे पुरस्कार्थी शिक्षक भास्कर साळवे यांनी कवी वामनदादा कर्डक यांची कविता सादर केली. शिक्षणाधिकारी कनोज यांनी प्रास्ताविक केले.

**'मंत्री झालो, पण माझे गाव तसेच'**

झिरवाळांचे भाषण ऐकण्यासाठी शिक्षक नक्की थांबतील या विश्वासाने माइकचा ताबा घेतल्याचे मंत्री भुसेंनी मिश्कीलपणे सांगितले. त्यानंतर मंत्री झिरवाळ यांनी आपल्या शैलीत मुद्दे मांडताना सभागृहात हास्याचे फवारे उडविले. 'मी आमदार झालो, मंत्रीही झालो, पण माझे गाव मात्र तसेच आहे. गाव काही बदलले नाही,' असे झिरवाळ यांनी त्यांच्या शैलीत सांगताच सभागृहात हशा पिकला. मात्र, माझे गाव आता शंभर टक्के बागायती झाल्याची पुष्टीही त्यांनी जोडली. माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांद्वारे शाळेला भरीव मदत मिळू शकेल, असेही ते म्हणाले.

**कोट्यवधींची पारितोषिके -**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध स्तरांवर चांगले शैक्षणिक काम करणाऱ्यांसाठी मंत्री भुसे यांनी प्रोत्साहनपर पारितोषिकांची घोषणा केली. त्यानुसार प्रथम क्रमांकासाठी पाच कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी तीन कोटी रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी दोन कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

## चंद्रपूर जिल्ह्यात नगराध्यक्ष : ७८, तर सदस्य : १ हजार २७५ उमेदवार रिंगणात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** राज्यातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतीच्या निवडणूका २ डिसेंबर रोजी होणार असून त्याचा निकाल दुसऱ्या दिवशी ३ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले असून आज अनेकांनी आपले अर्ज मागे घेतले आहे.

जिल्ह्यातील १० नगरपरिषदा व ०१ नगरपंचायत निवडणुकीची उमेदवारांनी तयारी सुरु केली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकानी आपले अर्ज मागे घेतले आहे. १० नगरपरिषद व १ नगरपंचायत साठी नगराध्यक्ष पदाकरीता एकूण ९१ अर्ज दाखल झाले होते. ज्यामध्ये आज गडचांदूर मध्ये अपक्ष शेख रफिक निझामुद्दीन, नागभीड नगरपरिषद बाबा सेवकराम जांभुळे व उके दशरथ रामचंद्र. सदस्य अर्ज - ११, भिसी नगरपंचायत अपक्ष पाटील आकाश विनोद, अपक्ष गेडाम आशिष हनुमंत, अपक्ष चुटके देवेंद्र श्रीरंग, अपक्ष बन्सोड तुळशीराम मारोती व अपक्ष मनोज नारायण डोंगरे. सदस्य-३. बल्लारपूर नगरपरिषद - अपक्ष कुल्दिवार मीनाक्षी सुनील, सदस्य अर्ज मागे - सिद्दीकी शमीमउद्दीन जलालउद्दीन, नक्कावार राजेश नारायण, श्रीवास्तव शेखर रामेश्वर, शेख शबाना प्रवीण रशिद, अलोणे कमल शाहीराज, मोरे राहुल टीकाराम, पाटील प्रीतम नामदेवराव, भद्रावती नगरपरिषद- अपक्ष अशोक दादाजी हजारे, सदस्य - केवळ मारोती ढोके, माधव नामदेवराव बांगडे. वरोरा नगरपरिषद - अपक्ष आगलावे विभा पुर्षोत्तम, अपक्ष वरघने वसुधा शंभूनाथ, सदस्य- शेख शब्बीर रमजान, कातोरे प्रमोद सुधाकर, घुमे आशिष मारोती, मधुकर मारोती तितरे, विरुटकर कार्तिक मारोती, ब्राह्मणकर सुनिता मारोती, शेळके गजानन दशरथ, स्वामी गौरव मनोहर. राजुरा - अपक्ष देशमुख विनायक शंकरराव, सदस्य - ३. ब्रम्हपूरी - सदस्य अर्ज - शेडे अनुकुल राजकुमार, बगमारे नोगेश वासुदेव, मेश्राम विवेक प्रेमलाल, खेत्रे सपना सुभाष, ममता शामू मालाधरे, घुग्घूस - सदस्य अर्ज मागे १४, मूल नगरपरिषद सदस्य - ३, चिमूर नगरपरिषद- सदस्य १२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी ९१ अर्ज दाखल झाले होते. आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ७८ उमेदवार नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत उरले आहेत. तर सदस्यपदासाठी एकूण १ हजार ३४६ अर्ज दाखल केले होते. अर्ज परत घेतल्यावर आता एकूण १ हजार २७५ उमेदवार रिंगणात उरले आहेतं चिन्ह वाटप केल्यावर २६ नोव्हेंबर पासून उमेदवारांच्यै प्रचाराची रणधुमाळी सुरु होणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबरला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

## तीर्थयात्रेहून येताना काळाची झडप

**दि.२१, छ. संभाजीनगर :** मध्य प्रदेशातील धार्मिक स्थळांचे दर्शन घेऊन परतणाऱ्या वाळूज परिसरातील महिलांच्या गटाला काल मंगळवारी पहाटे मोठा धक्का बसला. पंचवनी एक्स्प्रेस ट्रॅव्हल्समधून उतरल्यानंतर रिक्षाने घरी जात असताना ट्रॅव्हल्सच्या उघड्या असलेल्या डिक्कीतील धारदार पत्रा रिक्षाला लागला आणि त्यामुळे झालेल्या भीषण अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाल्या. हा अपघात पहाटे साडेतीन ते चारच्या सुमारास कर्णपुरा रोडवरील पंचवटी चौकाजवळ घडला.

आशा राजू चव्हाण (वय ३५, रा. सराफा गल्ली, जिल्हा परिषद शाळेजवळ, वाळूज) आणि लता राजू परदेशी (वय ४७, रा. सराफा गल्ली, वाळूज) असं मृत्यू पावलेल्या महिलांची नावं आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळूज भागातील सात महिला रविवारी मध्य प्रदेशात तीर्थयात्रेला गेल्या होत्या. सोमवारी रात्री उशिरा त्या छत्रपती संभाजीनगरला परतल्या.

पंचवटी चौकात ट्रॅव्हल्स थांब्यावर उतरल्यानंतर त्या सर्वजणी वाळूजकडे जाण्यासाठी रिक्षा क्र. MH 20 EF 2555 मध्ये बसल्या. त्याचवेळी त्याच ट्रॅव्हल्सची क्र. MP 09 AK 8016 मागची डिक्की पूर्णपणे उघडी राहिली होती. रिक्षा पुढे सरकताच उघड्या डिक्कीतील टोकदार लोखंडी पत्रा रिक्षाच्या छताला जोरदार आदळला. त्याचा जबर धक्का थेट महिलांच्या डोक्याला बसला, आणि घटनास्थळीच प्रचंड रक्तस्राव झाला. आजूबाजूच्या नागरिकांनी लगेच मदत करून जखमींना सरकारी घाटी रुग्णालयात दाखल केलं. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून आशा चव्हाण आणि लता परदेशी यांना मृत घोषित केलं.

## शरद पवार 'गेम' फिरवणार, भाजपला धडकी भरवणारी बातमी

**दि.२१, मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक लढण्याची भूमिका घेतली आहे. तर दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येताना दिसत आहेत. आगामी महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंची युती होताना दिसण्याची शक्यता आहे. पण राज ठाकरे यांना सोबत घेणं हे काँग्रेसच्या मुंबईतील काही नेत्यांना मान्य नाहीय. त्यामुळे काँग्रेसने याआधीच स्वतंत्र निवडणुकीची घोषणा केली होती. पण दोन दिवसांपूर्वी वेगळ्या घडामोडी घडल्या. त्यामुळे आता आगामी काळात महाविकास आघाडीत डॅमेज कंट्रोल होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे.



काँग्रेसच्या मुंबईतील नेत्यांच्या शिष्टमंडळाने दोन दिवसांपूर्वी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी जावून भेट घेतली. यावेळी काँग्रेस नेत्यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी शरद पवारांना युतीचा प्रस्ताव दिला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि काँग्रेस पक्षाची अनेक वर्षांपासूनची नैसर्गिक युती राहिलेली आहे. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुका एकत्र लढण्यासाठी आघाडीचा आपण प्रस्ताव दिल्याचं काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी सांगितलं होतं. तर शरद पवारांनी दोन दिवसांत काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांशी याबाबत चर्चा करु, असं काँग्रेसच्या शिष्टमंडळाला सांगितलं होतं. या सगळ्या घडामोडींनंतर आता सूत्रांकडून शरद पवार यांची भूमिका समोर येत आहे.

**•शरद पवार ठाकरे बंधूबाबत सकारात्मक...**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही भावांनी राजकीयदृष्ट्या एकत्र येण्यावर शरद पवार यांची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणूक ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढलं पाहिजे, अशी पवारांची भूमिका आहे. मतदार यादीमधील घोळा संदर्भात एकत्रित येत सत्याचा मोर्चा काढता, मग निवडणूक का वेगळी लढता? असा सवाल शरद पवारांनी केल्याचं सूत्रांची माहिती आहे. तसेच महाविकास आघाडीत मनसेला सामील करुन घेण्यासही शरद पवार सकारात्मक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


सूत्रांच्या माहितीनुसार, सर्वांना सोबत घेऊन लढलं तर सर्वांना फायदा होईल. फाटाफूट झाली तर दोघांचं नुकसान होईल. विरोधकांची एकजूट फार महत्त्वाची आहे, अशी उद्धव ठाकरेंची भूमिका आहे. तसचे उद्धव ठाकरे हे सध्या काँग्रेसच्या हायकमांडच्या संपर्कात असल्याची देखील माहिती समोर येत आहे. त्यामुळे या प्रकरणात आता काय-काय घडामोडी घडतात ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## खापरखेडा येथे २२ ते २६ नोव्हेंबर पर्यंत महानिर्मितीच्या आंतरगृह क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातर्फे महानिर्मितीच्या राज्यस्तरीय अंतर विद्युत केंद्र, आंतरगृह क्रीडा स्पर्धेचे दिनांक २२ ते २६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत खापरखेडा येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर २५ रोजी सायंकाळी ४ वाजता आंतरगृह क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटकीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून महानिर्मितीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, महानिर्मितीचे(संचलन) संचालक संजय मारुडकर, महानिर्मितीचे इंधन (प्रभारी) संचालक व प्रकल्प संचालक अभय हरणे, महानिर्मितीचे (वित्त) संचालक मनेश वाघीरकर, महानिर्मितीचे प्रकल्प व (संचलन व सुव्यवस्था)



२चे कार्यकारी संचालक राजेश पाटील, महानिर्मितीचे (कोळसा) व (संचलन व सुव्यवस्था) १चे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, महानिर्मितीचे(माहिती व तंत्रज्ञान) कार्यकारी संचालक नितीन चांदुरकर, महानिर्मितीचे(मानव व संसाधन), (पर्यावरण व सुरक्षितता) व सौर ऊर्जाचे कार्यकारी संचालक नितीन वाघ, महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम राजूरकर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

आयोजित स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा पारितोषक वितरण सोहळा २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता महानिर्मितीच्या सर्व उपरोक्त मान्यवरांच्या उपस्थितीत खापरखेडा येथील प्रकाश नगर वसाहतीतील क्रिकेट पटांगणात संपन्न होणार आहे.

आयोजित आंतर गृह क्रीडा स्पर्धेमध्ये ब्रिज, बुद्धिबळ, बॅडमिंटन टेबल टेनिस, कॅरम, कुस्ती आदी खेळांचा समावेश असून या सर्व स्पर्धा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मनोरंजन केंद्र क्रमांक १ व २ येथे घेण्यात येईल, अशी माहिती खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांनी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकातून दिली.

## मुदखेड नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी १० तर नगरसेवक पदासाठी ८८ उमेदवार निवडणूक रिंगणात

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**
**दि.२१, मुदखेड (नांदेड) :**

मुदखेड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठी दि. २१ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी १५ नगराध्यक्ष उमेदवारा पैकी एकूण ५ जणांनी माघार घेतल्याने १० नगराध्यक्षाचे उमेदवार आणि १० प्रभागातून ३५ नगरसेवक उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे आता एकूण १० प्रभागातून ८८ नगरसेवकांचे उमेदवार रिंगणात असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ.आनंद देऊळगांवकर यांनी पत्रकारांना बोलताना दिली. नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी एकूण १५ जणांपैकी आज रोजी शिवसेना उबाठा पक्षाकडून कल्याणी अविनाश झमकडे, यांनी तर अपक्ष असलेल्या अर्चना किरण देशपांडे, जनाबाई गोविंदराव नातेवाड, सविता किशोर पारवेकर, बिल्कीस फातेमा अब्दूल सत्तार आज रोजी या पाच जणांनी माघार घेतली तर एकूण १० प्रभागात १२३ उमेदवार रिंगणात होते.

दि.२१ नोव्हेंबर रोजी ३५ नगरसेवक उमेदवारांनी प्रामुख्याने बहुसंख्य अपक्षांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यामुळे निवडणुकीत ८८ नगरसेवकांचे उमेदवार निवडणुकीत राहणार असल्याची माहिती देण्यात आली आणि शहरात एकूण २१०४९ मतदार असून एकूण २५ मतदान केंद्राची स्थापना करण्याची माहिती




यावेळी देण्यात आली याप्रसंगी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नायब तहसीलदार मारोतराव जगताप आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा न.प. मुख्याधिकारी जगदीश दळवी यावेळी उपस्थित होते.

अक्षराज



# दस नंबरी 'नितिश कुमार' दहाव्यांदा मुख्यमंत्री

कोण म्हणत होते त्यांचे वय झाले आहे कोणी सांगत होते ते शारिरीक, मानसिक दृष्ट्या थकलेले आहेत, कोण म्हणतं होत त्यांना विस्मरण होते तर कोण म्हणतं होते बिहार विधानसभा निवडणुकीनंतर त्यांची भाजपच्या हातुन राजकीय विदाई निश्चित आहे त्यामुळेच बिहार मधे त्यांच्या नेतृत्वाखाली निवडणूका लढु मात्र त्यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी घोषित करणार नाही अशी एनडीए विशेषत: भाजपची भूमिका होती. गेल्या काही दिवसांपासून त्यांची अनेक वक्तव्ये वादग्रस्त देखील ठरली होती तर अनेकदा सार्वजनिक मंचावर त्यांच्या शारिरीक हालचाली देखील वादग्रस्त ठरत होत्या. निकालानंतर भाजप ८९ तर जेडीयू ला ८५ जागा मिळाल्या, ऊत्तर भारतात जवळपास सर्वच राज्यात भाजपचा मुख्यमंत्री झालेला आहे मात्र आजवर बिहार मधे भाजपचा मुख्यमंत्री झालेला नाही यावेळी परिस्थिती अनुकूल होती, तरी देखील भाजपने सुशासन बाबु नितिश कुमार यांनाच मुख्यमंत्री पदासाठी संधी दिली आणि नितिश बाबु हे बिहारचे दहाव्यांदा मुख्यमंत्री बनले.

जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनकाळात नितिश कुमार यांच्या राजकीय कारकीर्दीला सुरवात झाली. जयप्रकाश नारायण, कर्पुरी




ठाकुर, राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा पगडा असलेले समाजवादी विचार सरणी पगडा असलेल्या नितिश बाबुंनी केंद्रात देखील मंत्रीपद भुषवले आहे. १९७७ साली राजकारणात प्रवेश करुन १९८५ मधे पहिल्यांदाच बिहार विधानसभेत निवडुन गेले.नितिश कुमार यांनी २००० मधे पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली,मात्र ते केवळ सात दिवसच मुख्यमंत्री पदी राहु शकले. २००५ पासुन ते मुख्यमंत्रीपदी आहेत. विशेष म्हणजे स्वत:कडे बहुमत नसतांनाही कधी भाजप एनडीए कडुन तर कधी विरोधी आघाडी बरोबर जाऊन ते मुख्यमंत्री पद भुषवत आहेत. बिहार मधील जंगलराज च्या पार्श्वभूमीवर २००५ पासुन त्यांनी बिहार मधे सुशासन आणले म्हणूनच ते सुशासन बाबु म्हणून ओळखले जातात आणि आजवरच्या राजकीय वाटचालीत व्यक्तीश: त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप कोणी करु शकले नाही. भाजप सोबत कधीच जाणार नाही असे म्हणत त्यांनी भाजपची साथ सोडत भतीजा तेजस्वी यादव बरोबर सरकार स्थापन केले, कालांतराने २०२४ मधे सकाळी राजीनामा आणि दुपारी मुख्यमंत्री पदाची शपथ अशी किमया त्यांनी साधली.त् भाजपचे आणि एनडीए चे दरवाजे नितीशकुम ार यांना कायमचे बंद असे अमित शहा यांनी जाहिरपणे सांगितले. भाजप एनडीए विरोधात विरोधकांना एकत्र करण्यासाठी त्यांनीच पुढाकार घेत 'इंडिया' आघाडी साठी प्रयत्न केले मात्र इंडिया आघाडीचे संयोजक पद मिळत नाही हे दिसताच ते पुन्हा भाजप एनडीए कडे आले मात्र मुख्यमंत्री पदी कायम राहिले. त्यामुळेच त्यांच्या वर 'पलटुराम 'चा शिक्का बसला आहे.

देशाच्या इतिहासात पश्चिम बंगाल चे ज्योती बसु यांनी २८ वर्षे (१९७७-२००५) मुख्यमंत्री पद भुषवले आहे त्याखालोखाल सिक्किम चे पवन कुमार चामलिंग तसेच ओरिसाचे नवीन पटनायक यांनी २४ वर्षांहुन अधिक काळ मुख्यमंत्री पद भुषवले आहे. महाराष्ट्रात कै. वसंतराव नाईक हे सर्वाधिक ११ वर्षे मुख्यमंत्री राहिले आहेत. २०१० साली झालेल्या निवडणुकीत त्यांनी तब्बल ११५ तर सहकारी भाजपने ९१ जागा जिंकल्या होत्या ही नितीशकुमार यांच्या कार्याची पावती होती,यावेळेस त्यापेक्षाही जास्त जागा एनडीए ने जिंकल्या आहेत. यावेळेस महागठबंधन ने चांगलेच आव्हान निर्माण केले होते मात्र नितिश कुमार यांनी मतदारांसाठी अनेक योजना जाहीर केल्या, महिलांना दहा हजार रुपये आणि नंतर व्यवसाय सुरू करण्यासाठी दोन लाख रुपये देण्याची घोषणा केली जिविका दिदींना आत्मनिर्भर करण्याचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे ऐन निवडणुकीच्या तोंडावर घोषणा केली गेली आणि निवडणूकीच्या काळात निवडणूक आयोगाच्या साक्षीनेच महिलांच्या खात्यात पैसे देखील टाकले. त्याच बरोबर जिविका दिदी चा योग्य वापर करून घेतला याची परिणती बिहार मधे एनडीए ला ऐतिहासिक बहुमत मिळाले आणि दस नंबरी सुशासन बाबु नितिश कुमार दहाव्यांदा बिहार चे मुख्यमंत्री बनले.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# संपादकीय

## समाजवादी विचारधारेचे पाईक



समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायम सिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमि का खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मि ळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी सम ाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. तीन वर्षापूर्वी १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारधारेचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन !

# निष्ठेचं झालं खोबरं, अन् सत्तेसाठी चांगभलं...

स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या अंतर्गत महाराष्ट्रात २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतीच्या निवडणुका जाहिर झाल्या आहेत. त्यानंतर जिल्हा आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका होतील. त्याचं अनुषंगाने सद्या महाराष्ट्रात निवडणुकांचा माहोल तयार झाला असून ऐन थंडीत राजकिय वातावरण तापायला लागले आहे. २५ नोव्हेंबर अर्ज माघारी नंतर खरे लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष या तारखेकडे लागले असून साम, दाम, दंड, भेद या नितीचा वापर करून अनेक पक्षांचे नेते, पक्षाध्यक्ष, पुढारी अर्ज माघारीसाठी काही उमेदवारांना साखडे घालताना दिसत आहेत मनधरणी करत आहेत. यंदाच्या निवडणुकीत तिनपक्ष एकत्र असल्याने अनेकांची गोची झाली आहे. तर काहीजण पक्षाशी फारकत घेत सवतासुभा मांडला आहे. प्रत्येक राजकीय नेते आपल्या सोयीनुसार निर्णय घेत आहेत. सद्या पक्ष फोडाफोडी, राजकीय नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या कोलांट्या उड्या, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी अतिशय खालच्या पातळीवर जावून झडत असल्याने राजकारणाचा पार तमाशा झाला आहे. पक्षांवर आणि नेत्यावरची निष्ठा खुंटीला टांगून नेते आणि पदाधिकारीचं खोबरे तिकडे चांगभलं म्हणत आहेत. यातून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळणारं काय ? असा सवाल उपस्थित होतो आहे. पैसा आणि सत्तेभोवतीच राजकारण घुटमळतं आहे. व्यासपीठावर गोरगरीब जनता, वंचित व अपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी छातीचा कोट करुन लढू म्हणणारेचं पैसा आणि सत्तेच्या अमिषापोटी दुसऱ्या पक्षाचा आणि नेत्यांचा उदो, उदो करतांना दिसत आहेत यातून काय बोध घ्यायचा ? राजकारण आणि समाजकारण निकोप असायला हवे मात्र गेल्या काही वर्षात याला तडा गेला असून राजकारण भरकटत चालले आहे. जशाच तसे उत्तर देण्याच्या नादात राजकारणाचा दर्जा घसरत चालला आहे. याची जाण आणि भान कोणाला आहे का ? पक्ष, गट, तट व नेते बदलले तरी त्यामध्ये समाजाचे हित असले पाहिजे स्वत:चे आर्थिक व राजकीय हित साधणारे नेते, कार्यकर्ते आता समाजाला नको आहेत सौदाबाजीचे राजकारण तर नकोचं नको नेत्यांची, पोरांची त्यांच्या नातेवाईकांची गरीबी हटली जाते. परंतु गरिबांना हटवून तुमची गरीबी हटवू नका नाहीतर जनता जनार्दन योग्य धडा शिकवल्याशिवाय रहाणारं नाही.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

## कुतुहल..

नेतेमंडळी आताशा
काढे मोफत सहल
उधारीवाले ते उदार
सर्वांस वाटे कुतुहल

महिलांसाठी विशेष
म्हणावे तया एन्जल
खरेदी योग्यठिकाण
पहावा भिन्न अँगल

तरणाईसाठी सुप्रिय
गाजतेसफारी जंगल
एकत्रचं युवक युवती
जमवू द्या शुभ मंगल

खुशीत ठेवावे सगळे
आजीआजोबामंडळ
रमवा भजनी किर्तनी
खासनिवड धर्मस्थळ

बालचमूना बागेमध्ये
न्या काळजीनेजवळ
निमीत्तानेपालकांच्या
अधिक यायचे जवळ

निवडूनद्यावे आम्हांस
शुध्दहेतू असा निर्मळ
जनसेवा करायची हो
उत्कटहोते रे तळमळ

जिंकता जावू परदेशी
मातवू नका खळबळ
येवूपुन्हा जमेल तेंव्हा
आपण दिले बाहुबळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# तीर्थयात्रेतील लूटारू !

कतीच एक रील पाहण्यात आली ज्याम ध्ये सोलापूर अक्कलकोट मार्गावर चालणाऱ्या भावनिक लुटीवर रील बनवणाऱ्या महिलेने प्रकाश टाकून लोकांना सजग राहण्याचा सल्ला दिला आहे.

या रिलमध्ये त्या महिलेने आपला अनुभव सांगताना म्हटले आहे, कि ती या मार्गावरून कारने जात असताना एक युवक पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाडीला थांबण्याची विनंती करताना दिसला. त्यांना पाणी हवे असेल, म्हणून महिलेने गाडी थांबवून आपल्या जवळ असलेल्या पाण्याच्या कॅनमधून सदर तरुणाला पाण्याची बाटली भरून दिली. बाटली भरून देत असताना त्या तरुणाने आम्ही शेगाव येथून आलो असून अक्कलकोटला स्वामींच्या दर्शनाला चाललो आहोत असे सांगितले. त्या तरुणासोबत त्याची पत्नी भासणारी एक तरुणी सुद्धा होती, अशी अनेक जोडपी त्यांच्या सोबत मागोमाग चालत होती. त्यांच्या हातात भगवे ध्वज होते. आमच्यासोबत आणखीही बरेच जण असून त्यांनी सर्वांच्या जेवणासाठी पैशाची मागणी केली. सदर महिलेने स्वत:जवळील दोनशे रुपये दिल्यानंतर तेवढे पैसे पुरणार नसल्याचे तरुणाने सांगितले: आपल्याकडे तेव्हढेच पैसे असल्याचे सांगत महिला आपल्या गाडीने तिथून निघून गेली.

रस्त्यात भेटलेली मंडळी खरंच स्वाम ींच्या दर्शनासाठी जात आहेत की लोकांची भावनिक लूट करत आहेत याविषयी शंका आल्याने महिलेने पुढे जाऊन युटर्न घेऊन गाडी पुन्हा त्याच मार्गाने नेली, तेव्हा ज्याने आधी पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाडी थांबवली तोच तरुण पाण्याची रिकामी बाटली दाखवत गाडी थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसला. त्यांच्या जवळ जाताच आपली चोरी पकडली गेल्याचे त्यांच्या लक्षात आले आणि ते जोडपे तोंड लपवण्याचा प्रयत्न करू लागले.

नोव्हेंबर-डिसेंबर मासांत अनेक जण कुटुंबासह सहलीला आणि देवस्थानांना दर्शनासाठी निघतात. प्रवासात अधिक वेळ जायला नको म्हणून अनेक जण असेल तर स्वत:ची नाहीतर भाड्याने चारचाकी गाड्या बुक करतात, या गाड्यांना टार्गेट करून अशी लुटारू मंडळी दुपारच्या वेळेत स्वत: जवळील पाणी संपल्याचा कांगावा करत गाड्या थांबवण्याचा प्रयत्न करतात. एकदा गाडी थांबली कि त्यांच्याकडून खाण्यासाठी पैशाची याचना करतात. यांच्यासोबत असलेल्या महिला, लहान मुले, यांच्याकडे असलेल्या कपड्यांच्या बॅगा, हाती असलेले ध्वज यावरून हे खरेच देवदर्शनासाठी जात असल्याचा भास लोकांना होतो आणि लोक त्यांना खाण्यापिण्यासाठी पसे देतात. ती गाडी पुढे सरल्यानंतर काही वेळातच ते म ागून येणाऱ्या गाड्यांना खुणावून पुन्हा त्याच पद्धतीने त्यांच्याकडूनही पैसे उकळतात. देवदर्शनासाठी जाणारी मंडळी भावनेच्या भरात यांना बऱ्यापैकी पैसे देतात आणि पुण्य केल्याचे समाधान पदरी पाडून घेतात ज्यामध्ये या मंडळींचा आयता लाभ होतो. खरेतर हे पुण्यकर्म नसून या भामट्यांना आणखी भक्तांना लुटण्यासाठी दिलेले प्रोत्साहन असते त्यामुळे विशेषत: देवस्थानांना चारचाकी गाडीने जाणाऱ्या भाविकांनी या गोष्टीचे भान ठेवायला हवे. देवस्थानांच्या यात्रा जवळ आल्या कि अशाच प्रकारची काही मंडळी हाती टाळ आणि भगवे ध्वज घेऊन शहरांत घरोघरी जाऊन यात्रेसाठी पैसे मागताना दिसू लागतात. आपल्याला यात्रेला जाणे शक्य नाही, ही मंडळी चालली आहेत तर निदान यांना तरी आर्थिक साहाय्य करून भगवंतांच्या चरणी आपली सेवा रुजू करावी या भोळ्या भावनेने श्रद्धाळू मंडळी यांना पैसे आणि अन्य साहाय्य करतात. वास्तविकता ही मंडळी लोकांकडून पैसे गोळा करून देवस्थानांना जातही नाहीत. शहरी भागात मागील काही महिन्यांपासून आणखी एक प्रकार प्रकर्षाने दिसू लागला आहे. गर्दीच्या ठिकाणी काही महिला देवीची मूर्ती किंवा छायाचित्र ठेवलेले एक ताट किंवा ताम्हण हातात घेऊन पादचाऱ्यांना अडवताना दिसतात. ताट येणाऱ्या जाणाऱ्या सुशिक्षित लोकांसमोर धरून आम्ही देवीच्या यात्रेला जात असल्याचे सांगून ताटात पैसे टाकण्याची विनवणी करतात. या महिला नीटनेटकी साडी नेसून अंगावर दागिने वगैरे परिधान करून असतात. रस्त्याने जाणाऱ्या सुशिक्षित पुरुषांना त्या विशेषकरून टार्गेट करतात. त्यांचा नीटनेटकेपणा पाहून पुरुष मंडळी त्यांच्यावर सहज विश्वास टाकून २०-५० किंवा १०० रुपयांची नोट बिनदिक्कतपणे ताटात ठेवतात. देवाधर्माचा आधार घेऊन पूर्वी देवस्थानांच्या ठिकाणी याचक मंडळी एक-दोन रुपये मागत असत, आता मात्र लोकांच्या धार्मिक भावनेचा गैरफायदा घेणारी आधुनिक लुटारू मंडळी सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात निर्माण होऊ लागली आहे. लोकांचा देवभोळेपणा यांना दिवसागणिक श्रीमंत बनवत आहे. अशा मंडळींना दान देऊन आपल्याला काहीच लाभ न होता त्यांना मात्र बळ मिळत आहे. वाढत्या वयामुळे गलितगात्र झालेल्यांचे एकवेळ ठीक; मात्र हातपाय साबूत असताना भाविकांच्या धार्मिक भावनांचा लाभ घेऊन त्यांना लुटणाऱ्या या लुटारूना भगवंत त्यांच्या कर्माचे फळ देईलच मात्र अशा लोकांमुळे धम ाबाबत लोकांमध्ये गैरसमज निर्माण होऊ नये यासाठी भाविकांनी जागृत राहून त्यांना अद्दल घडवायला हवी.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी निधी द्या - खासदार लंके

## केंद्रीय पर्यटनमंत्री शेखावत यांच्याकडे मागणीचा प्रस्ताव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे शाश्वत संवर्धन, पर्यटन सुविधांचा विकास आणि वारसा सर्किट उभारण्यासाठी केंद्र सरकारकडे विशेष निधीची मागणी करत खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना सविस्तर प्रस्ताव पाठवला आहे. राज्यातील किल्ल्यांना राष्ट्रीय वारसा आणि पर्यटन दृष्टीने जागतिक स्तरावर नेण्याचा हा व्यापक प्रयत्न मानला जात आहे.



खा.लंके यांनी पाठवलेल्या प्रस्तावात नमूद केले की, महाराष्ट्रातील शिवकालीन किल्ले स्थापत्य, इतिहास, स्वातंत्र्यलढा आणि साम्राज्य निर्मितीच्या वैभवाचा ठसा आजही जपून ठेवतात. मात्र अनेक किल्ल्यांवर जिर्ण प्रवेशमार्ग, पाणी-शौचालयांचा अभाव, माहिती फलक नसणे, मार्गदर्शकांची कमतरता, पर्यटन केंद्र नसल्याने संपूर्ण पर्यटन क्षमता वापरली जात नाही. खा. लंके यांनी आपल्या प्रस्तावात नमूद केले की, त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आपला मावळा ही युवा संस्था विविध किल्ल्यांवर कचरा निर्मूलन, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, ऐतिहासिक जनजागृती, असे उपक्रम राबवत आहे. या स्वयंसेवी प्रयत्नांना शासकीय पाठिंबा व निधी मिळाल्यास संवर्धन अधिक प्रभावी होईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. पर्यटन मंत्रालयाने आव्हान आधारित गंतव्यस्थान विकास उपक्रमांतर्गत अहिल्यानगरच्या भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी २४.९९ कोटी रूपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल खा. लंके यांनी कृतज्ञता व्यक्त केली. याच धर्तीवर संपूर्ण राज्यासाठी एकात्मिक किल्ला सर्किट उभारण्याची त्यांनी मागणी केली आहे.

**प्रस्तावीत महाराष्ट्र किल्ला वारसा सर्किट**

या प्रस्तावात खासदार लंके यांनी प्रस्तावित केलेले किल्ला सर्किट पुढीलप्रमाणे: शिवनेरी - पुणे छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान, धर्मवीरगड - अहिल्यानगर, छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्यस्थळ, रायरेश्वर - पुणे, स्वराज्याची शपथ जिथे घेतली ती पवित्र भूमी, रामशेज - नाशिक, शिवकालीन सामरिक महत्त्व असलेला अजिंक्य किल्ला, तिकोणा - पुणे, अफजल खानावरील महत्त्वपूर्ण विजयाचे ऐतिहासिक स्थळ, प्रतापगड - सातारा, शिखर युद्धानंतर प्रमुख विशांतीस्थान विशामगड - अहिल्यानगर, छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी केंद्र, भुदरगड - कोल्हापूर, मराठा साम्राज्याच्या सामरिक व्यवस्थेचा आधारस्तंभ

**प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे**

किल्ल्यांवर पर्यटन पायाभूत सुविधा उभारणे,रस्ते, पाण्याची सोय, शौचालय, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग इ. डिजिटल माहिती केंद्र आणि ई - तिकीटींग, ऐतिहासिक माहितीचा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रसार, स्वच्छता व पर्यावरणपूरक वाहतूक, नैसर्गिक वारसा जतन करण्यासाठी शाश्वत पर्यटन, स्थानिक तरुणांसाठी रोजगारनिर्मिती, मार्गदर्शक तिकीटव्यवस्था, व्यवस्थापन या क्षेत्रात भर, स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाला मान्यता, आपल्या मावळा सारख्या संस्थांना थेट सहभागी करण्याचा प्रस्ताव

# 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, ठाणे :** जिल्हाधिकारी कार्यालयात 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटप करण्यात आले. रस्ते अपघातांत मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांचा वाढता सहभाग चिंताजनक असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी हेल्मेट वापराविषयी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.




ठाणे जिल्हाधिकारी आवारातील जिल्हा नियोजन भवनातील सभागृहात चित्रमेध व्हिजन आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, पोलीस विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्मेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित असलेले राघवेंद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, लेफ्टनंट कर्नल विवेक तिवारी, आयटी तज्ञ पवन द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल मोहित गौर (निवृत्त), जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा क्रीडाअधिकारी सुवर्णा बारटक्के, चित्रमेध व्हिजनचे आयोजक बबन लाटे व विशाल लाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ठाणे पोलीस स्कूलचे प्राथमिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

या उपक्रमाचे कौतुक करताना जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, ठाण्यात लहान मुलांना हेल्मेट वाटपाचा असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. सर्वसाधारणपणे १८ वर्षांनंतर वाहन चालविण्यास पात्र झाल्यावर तरुणांमध्ये हेल्मेटचा वापर वाढतो. परंतु राघवेंद्र कुमार यांनी मांडलेली 'लहानपणापासून हेल्मेटची सवय' ही संकल्पना मुलांमध्ये सुरक्षिततेची जाण निर्माण करणारी आहे. आज मुलांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात ते स्वतः हेल्मेटचा योग्य वापर करतील आणि समाजात ही त्याचा प्रसार करतील.रस्ते अपघातातील मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर असून हेल्मेटचाच वापर हे त्यावरील सर्वात सोपे व प्रभावी उपाय आहे, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच राघवेंद्र कुमार यांच्या २ लाख हेल्मेट वितरण मोहिमेची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमात हेल्मेट घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी घरी गेल्यावर आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना हेल्मेट न घालण्याचे धोके आणि वापराचे महत्त्व समजावून सांगावे, तसेच विनाहेल्मेट दिसणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना केले. राघवेंद्र कुमार यांनी या उपक्रमाचा उगम कसा झाला, तसेच हेल्मेट वापराचा प्रसार करण्यामागील अनुभव सांगितला.

ते म्हणाले, लहानपणापासून मुलांना हेल्मेटची सवय लावली, तर ते मोठे झाल्यावर कोणतेही वाहन कधीच विनाहेल्मेट चालवणार नाहीत. त्यामुळे भविष्यातील अपघाती मृत्यूचे प्रमाण निश्चितच कमी होईल. या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी वीर शहीद कॅप्टन विनायक गोरे यांच्या जीवनावरील प्रसंगावर देशप्रेमावर आधारित एकपात्री एकांकिका सादर केली.

या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना देशभक्तीचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांना प्रतिकात्मकरित्या हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक पटकविलेल्या शौर्या अंबुरे या विद्यार्थीनीचा जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# भारतीय कृषी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये गर्भाशय मुख कॅन्सर प्रतिबंध लसीकरण शिबिर संपन्न




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** स्वास्थ वृक्ष फाउंडेशन व इनरव्हील क्लब ऑफ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने व आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन यांच्या सहकार्याने व ईनर व्हीलच्या उपाध्यक्षा स्मिता बागडदेव यांच्या विशेष प्रयत्नाने भारतीय कृषी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थिनी करिता गर्भाशय मुखाचा कॅन्सर रोग प्रतिबंध लस शिबिर नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात एकूण १७५ मुलींना लस देण्यात आली. देशामध्ये गर्भाशय मुखाचा कॅन्सर झपाट्याने महिलांमध्ये दिसून येत आहे. मुलींना गर्भाशयाचा कॅन्सर होऊ नये याकरिता भारतीय कृषी विद्यालय येथे लसीकरण शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये वयोगट ९ ते २० मधील मुलींना लस देण्यात आली. शिबिरामध्ये स्वास्थ्य वृक्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. दीपिका चांडोक, उपाध्यक्ष अभिषेक चावला, मार्गदर्शक हेमचंद्र सालोडकर, साक्षी बोरकर यांच्या नेतृत्वात कुपलवार, अंकुश पिजेवार, अनुष्का भिवगडे तसेच ईनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या अध्यक्षा डॉ.शारदा रोशनखेडे, प्रीती नवले, सदस्य, इनरव्हील क्लब ऑफ नागपूर उपाध्यक्षा स्मिता बागडदेव व प्राचार्या अर्चना पन्नासे यांच्या सहकार्याने लसीकरण शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. मागील ३ वर्षापासून स्वास्थ वृक्ष फाउंडेशन धडाडीचे समाज हिताचे काम करीत आहे. आतापर्यंत दोन लाख मुलींना जागरूक करून जवळपास ३०हजार मुलींना मोफत लस उपलब्ध करून दिली आहे, असे स्वास्थ वृक्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. दीपिका चांदोक यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून सांगितले.

शाळेच्या माध्यमातून शाळेतील गोर गरिबाच्या मुलींना लसीकरणाचा लाभ मिळाला याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पन्नासे, सचिव राकेश पन्नासे, सहसचिव अखिलेश पन्नासे, कोषाध्यक्ष प्रज्ञाताई पन्नासे व शाळेच्या मुख्याध्यापिका व संचालिका अर्चना पन्नासे यांनी स्वास्थ वृक्ष फाउंडेशनच्या सर्व संचालकाचे व इंनरव्हील क्लब नागपूर ऑरेंज सिटीच्या सर्व संचालक मंडळाचे आभार व्यक्त केले. लसीकरण शिबिराचे नियोजन शाळेच्या पर्यवेक्षिका दीपिका तुपकर यांच्या नेतृत्वात मनोज महल्ले, पवार, अतुल अंबरते, मनोज तांबडे, प्रदीप भोर, बोन्द्रे, श्रेया दहिवले, शुभांगी ठाकरे, सुचिता खोरगडे, स्वाती बासोडे, निर्मला गीद, प्रभोधनी गुरनुले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# विंगच्या केंद्र प्रमुख यांचे आकस्मिक निधन

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२०, विंग (सातारा) :** सातारा जिल्हा शिक्षण विभागाच्या केंद्र प्रमुख संघटनेचे अध्यक्ष व खंडाळा तालुक्यातील विंग, नायगाव, लोणंद, खेड बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख सुभाष ढालपे यांचे दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी कर्तव्य बजावत



असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले होते त्यांना हॉस्पिटल मध्ये घेऊन जात असताना त्यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. ते मुळचे वाठार निंबाळकर ता. फलटण येथील रहिवाशी असून सध्या ते खंडाळा तालुका केंद्र प्रमुख म्हणून काम करत होते. सातारा जिल्हा शिक्षण विभागाच्या केंद्र प्रमुख संघटनेचे ते अध्यक्ष म्हणून प्रामाणिक काम करत होते तसेच खंडाळा पंचायत समिती शिक्षण विभागा कडून ते तालुक्यातील विंग, नायगाव, लोणंद, खेड बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. सुभाष ढालपे काम करीत असताना सर्व शिक्षक यांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत होती. तसेच विंग केंद्रात काम करत असताना मी सुहास महांगरे स्वतः शालेय व्यवस्थापन कमिटीच अध्यक्ष म्हणून काम करत असताना साहेबांनी मला खुप मोठया प्रमाणात शाळेच्या प्रगती साठी मार्गदर्शन केले आणि आपल्या विंग शाळेला व विंग केंद्रातील सर्व शाळेचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या अचानक जाण्याने शिक्षण विभागत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक चांगले केंद्र प्रमुख आपल्या तून गेले ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती लाभो.३

## थोडक्यात

### शहापूर आठवडी बाजारात रस्त्यावर वाहने पार्किंग केल्यास होणार दंडात्मक कारवाई



**अक्षराज : सुनील फर्डे**

**दि.२१, शहापूर (ठाणे) :** कृषी उत्पन्न बाजार समिती, शहापूर येथे आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दिलेल्या निवेदनावर आठवडी बाजार, वाहने पार्किंग व ग्राहकांना येणाऱ्या समस्या यावर चर्चा करण्यात आली. आठवडी बाजारासाठी येणाऱ्या व्यापारी आणि ग्राहकांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असुन रस्त्यावर वाहणे लावल्यास त्यावर वाहतूक पोलिसां कडुन दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. जागोजागी तसे बँनर लावून जनजागृती करण्यात येणार असल्याचे बाजार समितीकडुन सांगण्यात आले. यावेळी शहापूर पोलिस निरीक्षक मुकेश ढगे, राष्ट्रीय महार्माग सहाय्यक पोलिस निरीक्षक उबाळे, सभापती नंदकुमार डोहळे, उपसभापती शरद वेखंडे, संचालक वामन गायकर, संचालक किशोर दिवाणे, प्रहार तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, गोठेघर सरपंच गणेश कामडी, वाफे ग्रामपंचायत सदस्य डोंगरे, कळंबे उपसरपंच अविनाश किरपण, सबंधित ग्रामपंचायत ग्रामसेवक व प्रहार सचिव विनायक बोद्रें, सल्लागार रामचंद्र मडके, घनश्याम परदेशी, युवा संघटक मयुर किरपण, युवा सह सचिव निलेश बोटंकोडळे सह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रविद्रं चौधरी, निरीक्षक श्याम अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### ठाणे जिल्ह्यात कर्करोग निदानासाठी फिरती डायग्नोस्टिक व्हॅन

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.२१, ठाणे :** जिल्ह्यात कर्करोगाचे लवकर निदान करून नागरिकांना त्वरित उपचाराकडे प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येत असलेला कर्करोग डायग्नोस्टिक व्हॅन हा उपक्रम जिल्ह्यात अत्यंत यशस्वी ठरत आहे. ३ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नियोजित तालुक्यांमध्ये फिरत असलेल्या या व्हॅनला स्थानिक नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. हा उपक्रम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर राबविण्यात येत आहे.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे वेळेत निदान होणे अत्यंत गरजेचे असल्याने ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्यांना मोफत आणि सुलभ तपासणी उपलब्ध करून देणे हा व्हॅनचा उद्देश आहे. कर्करोग निदान व्हॅनद्वारे मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग प्रमुख कर्करोगांची तपासणी केली जात आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, व्हॅनमध्ये कर्करोग तपासणीसाठी आवश्यक आधुनिक उपकरणे उपलब्ध असून प्रशिक्षित वैद्यकीय टीमद्वारे नियमित तपासणी केली जाते. कर्करोगाचे निदान प्राथमिक अवस्थेत झाल्यास उपचाराने हा आजार पूर्णपणे नियंत्रित व बरा होऊ शकतो, यावर त्यांनी भर दिला. व्हॅन सध्या नियोजित कार्यक्रमानुसार कल्याण, भिवंडी, अंबरनाथ, मुरबाड, शहापूर तालुक्यांमध्ये फिरत आहे. स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या समन्वयातून जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांना तारीख व ठिकाणाची माहिती वेळोवेळी दिली जात असून मोठ्या प्रमाणात लोक सहभाग वाढत आहे. ३ नोव्हेंबर पासून आज अखेर पर्यंत २ हजार ९७५ एकूण व्यक्तींची तपासणी केली असून आढळलेले संशयित व्यक्ती २८ आहेत. तपासणीत आढळलेल्या संशयित रुग्णांना पुढील तपासणी व योग्य उपचारासाठी संबंधित वैद्यकीय संस्थेकडे तात्काळ पाठविण्यात आले आहे. कर्करोगाचे वेळीच निदान झाले तर उपचार पूर्णपणे यशस्वी होतात. त्यामुळे नागरिकांनी या मोफत तपासणी उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

### बल्लारपूर मतदार संघातील ५३२ रुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया

#### रुग्णांनी मानले आ.मुनगंटीवार यांचे आभार

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२१, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर विधानसभेत राबविण्यात आलेल्या भव्य मोतीबिंदू तपासणी व उपचार मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. गेल्या ३ महिन्यांमध्ये ४ हजार नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. त्यापैकी दृष्टीवर गंभीर परिणाम झालेल्या ५३२ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. शस्त्रक्रिया पार पडल्यावर रुग्णांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली. ३ महिन्यांत बल्लारपूर मतदारसंघातील गावागावांत आठवड्यातील शनिवार आणि रविवार या दोन दिवसांमध्ये मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमध्ये ४ हजार नागरिकांची मोतीबिंदू तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५३२ रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाले.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून ५३२ रुग्णांवर शालिनीताई मेघे रुग्णालय, वानाडोंगरी, नागपूर येथे पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. या रुग्णांसाठी प्रवास, निवास आणि भोजनाची संपूर्ण व्यवस्था देखील मोफत उपलब्ध करून देण्यात आली. बल्लारपूर मतदारसंघात एकही मोतीबिंदू रुग्ण उपचाराविना राहू नये, हा आ.सुधीर मुनगंटीवार यांचा दृढनिश्चय आहे. यानुसार, जानेवारी २०२६ पासून या मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू होत असून बल्लारपूर मतदारसंघातील गावागावांत पुन्हा मोफत तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. ज्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली, त्यांनी आ.मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत. अनेकांनी भावनिक प्रतिक्रिया व्यक्त करत सांगितले की, आ.मुनगंटीवार यांच्यामुळे फक्त दृष्टी नव्हेतर जगण्याचा आत्मविश्वास परत मिळाला. या उपक्रमामुळे अनेक ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू खुलले आहे आणि त्यांच्या आयुष्यात प्रकाशाची नवी सुरुवात झाली आहे, अश्याही भावना व्यक्त होत आहेत.